# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशी—४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) चा कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६(सत्र २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

( विद्या विभाग )

एम. आय. डी. सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली —४४२६०५ (विद्या) फोन नंबर ७१३२. २२३३२३

गोविग/विद्या/क्र/२३३/१९ दि.२८/६/२०१९

## परिपत्रक

**विषय:— महाविद्यालयाकडून अतिरिक्त शुल्क आकारणीबाबत.**

**संदर्भ:— समाजकल्याण कार्यालय क्र.सआसक/गड/शिष्यवृत्ती/शुल्क आकारणीबाबत /२०१९—२०/३८६ दिनांक ११/०६/२०१९**

उपरोक्त संदर्भांकित पत्रान्वये, "महाविद्यालयीन शिष्यवृत्तीस पात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून अतिरिक्त शुल्काची आकारणी करून विद्यार्थ्यांची आर्थिक पिळवणूक करीत असल्याबाबतचे संदर्भिय पत्रात नमुद करण्यात आलेले आहे. मागासवर्गीय शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांकडून शासन अनुज्ञेय असलेले कोणतेही शुल्क प्रवेशाच्या वेळी आकारण्यात येऊ नये अन्यथा सदर महाविद्यालय प्रशासकीय कार्यवाहीस पात्र राहील" असे नमुद आहे.

तसेच "महाविद्यालयास मान्यता प्राप्त अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर शुल्काचे दरपत्रक व इतर शुल्क आकारतांना संबंधित विभागाकडून मान्य असलेल्या शुल्काची परिपूर्ण माहिती महाविद्यालयाचे दर्शनी भागात फलक लावण्यात यावे" असेही नमूद आहे. कृपया याची नोंद घेवून पुढील कार्यवाही करावी.

(डॉ.आय.एस.मोहुर्ले)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

प्रतिलिपी:—

१. मा.प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग,नागपूर
२. मा.शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.गडचिरोली

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
विद्या विभाग
आवक क्र. 376 दि. 14/06/2019
जावक क्र. ........ दि. ........

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 6330 दि. 12/6/19
जावक क्र. 730 दि. 14/6/19

महाराष्ट्र शासन

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग.**

**कार्यालय-सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, गडचिरोली.**

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, एल.आय.सी. रोड गडचिरोली.**

*E-Mail*-sdswog@gmail.com , 07132-222192

क्र.सआसक/गड/शिष्यवृत्ती/ शुल्क आकरणीबाबत/२०१९-२०/386 दिनांक :- 11/०६/२०१९

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
आवक/जावक विभाग
आवक 19524 दि. 11/6/19
जावक 19524 दि. 11/6/19

प्रति,

प्राचार्य,
सर्व महाविद्यालय,
जिल्हा-गडचिरोली.

विषय :- महाविद्यालयाकडून अतिरिक्त शुल्क आकारणीबाबत.

संदर्भ :- मा. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नागपुर यांचे पत्र क्र.२७१०
दि.७/६/२०१९

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, काही महाविद्यालय शिष्यवृत्तीस पात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून अतिरीक्त शुल्काची आकारणी करुन विद्यार्थ्यांची आर्थिक पिळवणुक करीत असल्याबाबतचे पत्र प्राप्त झाले आहे. तरी मा. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग नागपुर यांचे संदर्भिय परिपत्रकानुसार विषयाचे गांभिर्य लक्षात घेता आपणास सुचित करण्यात येते की, मागासवर्गीय शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांकडून शासन अनुज्ञेय असलेले कोणतेही शुल्क प्रवेशाच्या वेळी आकारण्यात येऊ नये अन्यथा सदर महाविद्यालय प्रशासकीय कार्यवाहीस पात्र राहिल याची दखल घेण्यात यावी.

तसेच महाविद्यालयास मान्यता प्राप्त अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर शुल्काचे दरपत्रक व इतर शुल्क आकारतांना संबंधित विभागाकडून मान्य असलेल्या शुल्काची परीपुर्ण माहिती (मान्यतेच्या पत्रासह व स्वाक्षरीसह) महाविद्यालयाचे दर्शनी भागात फलक लावण्यात यावे याची नोंद घ्यावी.

सही/-
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, गडचिरोली

प्रतिलिपी माहितीस्तव तथा उचित कार्यवाहीस्तव सविनय सादरः-

१.मा. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नागपुर.
२.मा.कुलसचिव,गोंडवाना विदयापीठ,गडचिरोली.
३.मा.शिक्षणाधिकारी (माध्य.)जि.प.गडचिरोली.

सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, गडचिरोली